

अभिजित पाटील, रोहित नायकवडी, निरंजन फडतारे, अविनाश कोकितकर, अमोलकुमार कम्मे.

## संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयाचे पाच विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीमध्ये

**पन्हाळा (प्रतिनिधी) :** पन्हाळा येथील संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयातील एकूण पाच विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठ अंतर्गत घेण्यात आलेल्या एप्रिल २०१६ च्या परीक्षेमध्ये गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळवले आहे. यामध्ये ऑटोमोबाईल विभागाच्या अविनाश अण्णाप्पा कोकितकर याने ७४.१२ टक्के गुण मिळवून शिवाजी विद्यापीठामध्ये तिसरा क्रमांक पटकावला. अभिजित संजय पाटील याने ७४ टक्के गुण मिळवून चौथा क्रमांक पटकावला. तर निरंजन मधुकर फडतारे याने ७०.६८ टक्के गुण मिळवून आठवा क्रमांक मिळवला. इलेक्ट्रिकल विभागाचा अमोलकुमार राजाराम कम्मे याने ७९.५टक्के गुण मिळवून शिवाजी विद्यापीठामध्ये चौथा क्रमांक मिळवला. तर रोहित शामराव नायकवडी याने ७८.५६ टक्के गुण मिळवून सातवा क्रमांक पटकावला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयामार्फत अभिनंदन व सत्कार करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांना ऑटोमोबाईलचे विभाग प्रमुख प्रा. एस. एल. घोडके व इलेक्ट्रिकल विभागाचे विभागप्रमुख प्रा. पी. पी. कुलकर्णी यांच्यासह महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख व प्राध्यापक तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. व्ही. मूलगुंड, संजीवन संस्थेचे चेअरमन पी. आर. भोसले व सहसचिव एन. आर. भोसले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



अविनाश कोकितकर अभिजित पाटील निरंजन फडतारे अमोलकुमार कम्मे

# संजीवन अभियांत्रिकीचे पाच विद्यार्थी गुणवत्ता यादीत

**पन्हाळा / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेत पन्हाळा येथील संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयाचे पाच विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले.

ऑटोमोबाईल विभागाच्या अविनाश अण्णाप्पा कोकितकर याने ७४.१२ टक्के गुण मिळवून शिवाजी विद्यापीठात तिसरा, अभिजित संजय पाटील याने ७४ टक्के गुण मिळवून चौथा, निरंजन मधुकर फडतारे याने ७०.६८ टक्के गुण मिळवून आठवा क्रमांक मिळवला आहे.

इलेक्ट्रिकल विभागाचा अमोलकुमार राजाराम कम्मे हा ७९.५ टक्के गुण मिळवून विद्यापिठामध्ये चौथा आला. रोहित शामराव नायकवडी याने ७८.५६ टक्के गुण मिळवून सातवा क्रमांक पटकावला.



रोहित नायकवडी

यशस्वी विद्यार्थ्यांचा महाविद्यालयातर्फे सत्कार करण्यात आला. ऑटोमोबाईल विभागप्रमुख प्रा. एस. एल. घोडके व इलेक्ट्रिकलचे विभाग प्रमुख प्रा. पी. पी. कुलकर्णी यांच्यासह प्राचार्य डॉ. जी. व्ही. मुलगुंड, संजीवन संस्थेचे चेअरमन पी. आर. भोसले व सहसचिव एन. आर. भोसले यांचे मार्गदर्शन यशस्वी विद्यार्थ्यांना लाभले.